# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 302/2023 दिनांक : 05.08.2023

## 1)जबरी चोरी :–

**हिमायतनगर** :–दिनांक 04.08.2023 रोजी 12.30 वा. चे सुमारास, **दरेसरसम गावचे बाहेर तलवाचे जवळ ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** फिर्यादी हा बचत गटाची वसुली करून परत हिमायतनगर येथे मोटार सायकल वर येत असताना त्यांचे मोटार सायकल समोर दोन अनोळखी इसम मोटारसायकलवर येऊन यातील फिर्यादीच्या मोटार सायकल समोर आडवी लावून चाकुचा धाक दाखवुन बळजबरीने फिर्यादी जवळील बॅग त्या मधील नगदी 1,62,235/–रूपये बॅगसह जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी बालाजी माधव पंतुलवाड, वय 23 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. मोघाळी ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 161/2023 कलम 392,341,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री चौधरी, मो.क्रं. 9764123018** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**अर्धापुर** :– दिनांक 02.08.2023 रोजी 22.15 वा. ते दिनांक 03.08.2023 रोजी 10.40 वा. चे दरम्यान, **हॉटेल रॅडीसन बार ॲण्ड रेस्टारेंट जांभरून पाटीजवळ जांभरून शिवार हिंगोली ते नांदेड जाणारे रोडवर ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद बार चे शेटरचे कुलूप तोडून वाकून आत प्रवेश करून बार मधील विदेशी दारू, बीअर, टी.व्ही. कॅमेरा, डि.व्ही.आर., सेटअप कॅम्युटर, भांडे व इतर साहित्य असा एकुण किंमती 1,88,960/–रूपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला व सर्व वायरची नासधुस केली. वगैरे **फिर्यादी संतोष प्रकाशराव रतनवार, वय 40 वर्षे, व्यवसाय व्यापार मॅनेजर व्यवस्थापक रा. भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरन 272/2023 कलम 457,380,427 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री नागटीकळ, मो.क्रं. 9325031960** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरीचा प्रयत्न :–

**बिलोली** :– दिनांक 04.08.2023 रोजी 05.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर बिलोली ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी ची हिरो होंडा शाईन कंपणीची मो. सा. क्रमांक एमएच–26/एएन–4096 किंमती 30,000/–रूपयाची नमुद ठिकाणीवरून यातील नमुद दोन आरोपीतांनी चोरून नेत असताना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी शेख शब्बीर शेख चांद साब, वय 27 वर्षे, व्यवसाय पॉन शॉप चाकल रा. मोठी मज्जीद जवळ बिलोली ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 138/2023 कलम 379,511 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2542 सोनकांबळे, मो. क्रं. 9922172300** हे करीत आहेत.

## 4)मो. सा. चोरी :–

**भाग्यनगर** :– दिनांक 01.08.2023 रोजी 00.00 वा. ते 06.00 वा. चे दरम्यान, **सत्यजित अपार्टमेंट जय भवानी चौक पुर्णा रोड वाडी बु. नांदेड येथे,** यातील फिर्यादी ची होंडा सी.बी. शाईन कंपणीची मो. सा. क्रमांक एमएच–26/एझेड–2634 किंमती 30,000/–रूपयाची नमुद ठिकाणीवरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी धर्माजी सुभाषराव राजारपल्लु, वय 37 वर्षे, सत्यजित अपार्टमेंट जय भवानी चौक पुर्णा रोड वाडी बु. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 289/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2014 सिरसाट, मो. क्रं. 9423306245** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :–

**नांदेड ग्रामीण** :–दिनांक 04.08.2023 रोजी 07.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर सम्राट नगर, सिडको नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांची पत्नी हे त्यांचे घरासमोर उभे असतांना यातील नमुद आरोपीने गाडी काढ म्हणल्याचे कारणावरून फिर्यादीस त्याचे छातीवर तलवारीने मारले व फिर्यादीचे पत्नीस शिवीगाळ करून थापडबुक्याने व तलवारीने डावे हाताचे दंडावर मारून गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी शरद किशनराव मोतेवार, वय 55 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. सम्राट नगर, सिडको, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 565/2023 कलम 326,323,504,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जाधव, मो. नं. 9823352701** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**1)विमानतळ** :– दिनांक 28.08.2016 ते दिनांक 21.06.2022 चे दरम्यान, **शिवनेरी नगर सांगवी नांदेड व सासरी भोला नगर कळवा ठाणे जि. ठाणे ह. मु. शिवनेरीनगर, नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस तुला निट स्वंयपाक करता येत नाही, नविन व्यवसायासाठी माहेरहुन एक लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ करून थापड बुक्यांनी मारहाण करून तीचा शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 27 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 264/2023 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2735 खंदारे, मो.क्रं. 8551059899** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :–** दिनांक 08.03.2022 रोजी 10.00 वा. ते दिनांक 03.08.2023 रोजी 13.00 वा. चे दरम्यान, **गोराई मुंबई ह.मु. सोनाई नगर कॅनल रोड वडीलांचे घरी नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस फर्निचर व कार चार चाकी वाहन घेण्यासाठी माहेरहुन दहा लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ करून थापड बुक्यांनी मारहाण करून तीचा शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 32 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 290/2023 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/06 हंबर्डे, मो.क्रं. 9881028300** हे करीत आहेत.

**3)नायगाव :–** दिनांक 20.12.2021 ते दिनांक 08.07.2023 रोजी चे दरम्यान, **नागठाणा खु ता. उमरी ह.मु. व्यंकटेश नगर नायगाव ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद अकरा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस किराना दुकान घेण्यासाठी माहेरहुन दोन लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ करून थापड बुक्यांनी मारहाण करून तीचा शारिरीक व माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी 23 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरनं 107/2023 कलम 498(अ),323,504,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/349 सांगवीकर, मो.क्रं. 7875643333** हे करीत आहेत.

## 7)फसवणुक :–

**मुखेड :–** दिनांक 03.08.2023 रोजी 03.30 वा. चे सुमारास, **शाहीर अण्णाभाऊ साठे कॉलेज समोर रोडवर, मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन अनोळखी इसम यांनी फिर्यादीच्या पाठीमागून मोटार सायकल वरून येवून फिर्यादीस थांबवून आम्ही पोलीस आहोत पुढे दरोडा पडलेला आहे तुमच्या कडील सोन्याचे दागीने काढुन दया असे म्हणाल्याने फिर्यादीने त्याच्या कडील असलेले सोन्याचे दागीने एकुण किंमती 81,327/–रूपयाचे अनोळखी इसमाला काढुन दिले असता सदरचे सोन्याचे दागिने कागदामध्ये गुंडाळल्याचे भासवुन फिर्यादीस एका कागदाच्या पुडीत दोन दगडी खडे देवून फिर्यादीचे खरे सोने घेवून जावून फिर्यादीची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी बालासाहेब रामचंद्र पाटील, वय 69 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त रा. बेरळी खुर्द ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरन 227/2023 कलम 420,419,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री अनसापुरे, ने. पोस्टे मुखेड, नांदेड, मो.नं. 9130052062** हे करीत आहेत.

## 8)प्राण्यांना क्रुरतेने वागणुक :–

**भोकर :–** दिनांक 04.08.2023 रोजी 18.57 वा. चे सुमारास, **पार्डी बायपास अर्धापूर ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी त्याचे ताब्यातील महिंद्रा बोलेरो पिकअप क्रं एमएच–26/एडी–8996 किंमती 2,00,000/–रूपयाचे या वाहानांमध्ये बैल व गाई जातीचे एकुण 10 जनावरे एकुण किंमती 92,000/– रूपयाचे दाटीवाटीने निर्दयतेने क्रुरतेने कोंबुन वेदनादायी रित्या सदरचे जनावरे कतली साठी घेवून जात असताना, वाहतुकीचा कोणताही परवाना नसतांना बिना परवाना वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री हनुमंत अमृतराव गायकवाड, ने. पोस्टे अर्धापूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरन 28/2023 कलम 11(1)(ड)(ई) प्राण्यांना क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध करण्या बाबत अधिनियम 1960 कायदा सह कलम 5(अ),9,11, महाराष्ट्र प्राणीरक्षण अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सुरवसे, मो.क्रं. 9766105366** हे करीत आहेत.